जा.क्र.डॉबासाकोकृवि/वि.ग्रं/68/२०२२.२३
विद्यापीठ ग्रंथालय,दापोली
डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.
दिनांक –25/7/2022

विषय–: विद्यापीठ ग्रंथालयाकरिता कंत्राटी पध्दतीने कामे करणेबाबत....

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून विद्यापीठ ग्रंथालय, दापोली येथे **लिपीक टंकलेखक** (कंत्राटी) या पदाची तात्पुरती नेमणूक करणेकरीता सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. लिपीक या पदासाठी अर्हता धारक उमेदवारांची निवड करावयाची आहे. सदर ठेका पध्दतीने काम करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव आणि अपेक्षित वेतन इत्यादी बाबी नमुद करून त्यांचे **अर्ज/दरपत्रक मा. प्रभारी अधिकरी, विद्यापीठ ग्रंथालय दापोली ता. दापोली जि. रत्नागिरी** यांच्या नावे दि.09/08/२०२२, ०५:३० वाजेपर्यत **विद्यापीठ ग्रंथालय, दापोली, ता.दापोली जि.रत्नागिरी या कार्यालयाकडे विहीत कालावधीत पोहचतील असे सादर करावे.**

| तपशिल | शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| लिपीक–टंकलेखक | १.पदवीधर (वाणिज्य,विज्ञान)<br>२.मराठी टायपिंग ३० श.प्र.मि. आणि<br>इंग्रजी टायपिंग ४० श.प्र.मि.<br>३.एमएससीआयटी. (संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक, संगणकाचे अर्हता असणाऱ्याना प्राधान्य)<br>४. डॉ. बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठामध्ये काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. |

**<u>वरील तात्पुरती नेमणूक खालील अटी व शर्तीना अधिन राहून करावयाची आहे.</u>**

१. सदर नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ठेका पध्दतीचा अवलंब करून आवश्यकतेप्रमाणे करण्यात येईल.
२. **इच्छूक उमेदावाराने आपला प्रती महिन्याचा दर दरपत्रकात नमुद करावा.**
३. दरपत्रकासोबत सर्व आवश्यक कागदपत्राच्या छायांकीत प्रती तसेच रहिवासाचा पुरावा छायांकीत प्रतीसंह जोडणे आवश्यक आहे.
४. नियुक्त केलेल्या उमेदवाराच्या कामाचे मुल्यमापन प्रभारी अधिकारी, विद्यापीठ ग्रंथालय दापोली यांचमार्फत करण्यात येईल. सदर उमेदवारचे काम असमाधानकारक आढळल्यास करण्यात आलेली नियुक्ती दिलेल्या कालावधीच्या पुर्वी समाप्त करण्याचे अधिकारी निम्नस्वाक्षरीकार यांना राहतील.

५. उमेदवाराला ठेका संपण्यापूर्वी सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास त्याने तशी अगाऊ सुचना एक महिना अगोदर लेखी स्वरूपात या कार्यालयाला देणे आवश्यक आहे. अशी अगाऊ सुचना न दिल्यास संबंधिताकडून एक महिन्याचा मेहनताना वसुल करण्यात येईल आणि अशा व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेतला जाणार नाही.

६. उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयामर्यादा ही शासन धोरणानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्ष आणि मागासवर्गीयासाठी प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४२ वर्ष राहील.

७. कामाचे स्वरूप पाहून सदर ठेका सुरू ठेवायचा किंवा कोणतेही कारण न दाखवता केंव्हाही समाप्त करायचा अधिकार निम्नस्वाक्षरीकरांकडे राहील.

**८. सदर ठेका अकरा महिने कालावधीकरीता राहील.**

**९. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचीका क्र. एसएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.**

१०. कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे तसेच कोणतेही कारण न देता सदरील प्रक्रिया रद्द करण्याबाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

११. पोस्टाने किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव दरपत्रक/अर्ज या कार्यालयास विहीत वेळेत प्राप्त न झाल्यास/विंलब झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**१२. दरपत्रक सादर करताना लिफाफ्यावर लिपीक टंकलेखक कंत्राटी पदासाठीचे दरपत्रक असे नमुद करावे.**

१३. कामाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रू.१००/— च्या बॉन्ड पेपरवर नेमणूक झालेल्या उमेदवाराने देणे बंधनकारक आहे.

**प्रभारी अधिकारी,**<br>
**विद्यापीठ ग्रंथालय,दापोली**<br>
**डॉ.बाळासाहेब सांवत कोकण कृषि विद्यापीठ**<br>
**दापोली जि.रत्नागिरी.**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी:

१. प्रमुख कृषि ज्ञान व्यवस्थापन केंद्र (AKMU) डॉ.बा.सा.कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सदर त्यांना कळविण्यात येते की सदर नोटीस विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२. विद्यापीठ नोटीस बोर्ड

३. दापोली नगरपंचायत दापोली जि.रत्नागिरी

४. ग्रामपंचयात गिम्हवणे ता. दापोली जि.रत्नागिरी

५. ग्रामपंचयात जालगांव ता. दापोली जि.रत्नागिरी